**महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, १९८१ या कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी गस्ती नौका भाड्याने घेण्याबाबत...**

# महाराष्ट्र शासन

## कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

**शासन शुद्धीपत्रक क्रमांकः मत्स्यवि-१११५/प्र.क्र. १७४- भाग १/पदुम-१४**

**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२**

**दिनांक : ६ सप्टेंबर, २०२१**

**वाचा :**

1. **समक्रमांकाचा शासन निर्णय दि. ०१ सप्टेंबर, २०१५**
2. **आयुक्तांचे पत्र क्र. मत्स्य/सा/०५२८०१/३४४/२०२१-२२, दि. ०४.०८.२०२१**

**प्रस्तावना :**

उपरोक्त वाचा अ. क्र. १ येथील शासन निर्णयान्वये महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, १९८१ या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी ५ गस्ती नौका भाड्याने घेण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच भाड्याने घेण्यात येणाऱ्या गस्ती नौकांच्या अटी, शर्ती व तांत्रिक तपशील वाचा -१ येथील शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट-अ मध्ये नमूद करण्यात आलेला आहे.

सद्यस्थितीत राज्याच्या जलधी क्षेत्रात अनधिकृत एलईडी/पर्ससीन मासेमारी साहित्य वापरून मासेमारी करणाऱ्यांची संख्या वाढलेली आहे. तसेच, परराज्यातील हायस्पीड नौका यांच्याद्वारे मोठ्या प्रमाणावर घुसखोरी केली जात आहे. राज्याच्या जलधी क्षेत्रातील अनधिकृत मासेमारीस आळा घालण्यासाठी व पर राज्यातील हायस्पीड नौकांवर वचक बसविण्यासाठी आयुक्त, मत्स्यव्यवसाय यांनी वाचा अ. क्र. २ येथील पत्रान्वये प्रस्तावित केल्याप्रमाणे दि. ०१ सप्टेंबर, २०१५ रोजीच्या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट -अ मधील अटी, शर्ती व तांत्रिक तपशीलामध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन शुद्धीपत्रक

आयुक्त, मत्स्यव्यवसाय यांनी वाचा अ. क्र. २ येथील पत्रान्वये प्रस्तावित केल्याप्रमाणे दि. ०१ सप्टेंबर, २०१५ रोजीच्या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट -अ मधील अटी, शर्ती व तांत्रिक तपशीलामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यास शासन मान्यता देत आहे.

**अ.क्र. १ ऐवजी खालीलप्रमाणे वाचावे -**

"यांत्रिक स्वरुपाची नौका असावी".

**अ.क्र. २ ऐवजी खालीलप्रमाणे वाचावे -**

"यांत्रिक नौकेची लांबी किमान २०.० मी. व रुंदी ७.० मी. असावी (Merchant Shipping Act, १९५८ अंतर्गत नोंदणीकृत असलेल्या)"

**अ.क्र. ३ ऐवजी खालीलप्रमाणे वाचावे** -

"यांत्रिक नौकेची इंजिन क्षमता किमान ४५० हॉर्सपॉवर (डबल इंजिन) आणि कमाल वेग मर्यादा किमान २५ नॉट इतकी असावी"

**अ.क्र. ४ ऐवजी खालीलप्रमाणे वाचावे** -

"यांत्रिक नौकेवर एकावेळी किमान ८ ते १० व्यक्ती बसतील अशी बैठक सुविधा असणारी किमान ३.०४ X २.१३ X १.८२ मी. (लांबी *रुंदी*उंची) आकाराची केबिन असावी. यांत्रिक नौकेवर सर्व सोयींनी युक्त शौचालय व अल्पोपहारासाठी व चहापाणी करण्यासाठी जागा असावी. याचबरोबर नौकेवर प्रथमोपचार पेटी असावी."

**अ.क्र. ५ ऐवजी खालीलप्रमाणे वाचावे** -

"नौकेवर विद्युत दिवे, सर्च लाईट, सिग्नल, इशाऱ्यासाठी भोंगे, Marine & Night vision Binoculars ही यंत्र सामुग्री असावी.

**अ.क्र. ६ ऐवजी खालीलप्रमाणे वाचावे** -

"नौकेवर नौकानयनासाठी संभाषणाची अद्यावत यंत्रसामुग्री जसे की, वॉकी-टॉकी (two way communication V.H.F.) असावे. तसेच गस्ती दरम्यान गस्ती नौकेची स्थिती दर्शविणारी ग्लोबल पोझीशनींग सिस्टीम (G.P.S.), Automatic Identification System-Vessel Tracking System (AIS-VTS), सी.सी.टी.व्ही. (CCTV), बसविलेले असावे"

**अ.क्र. ८ ऐवजी खालीलप्रमाणे वाचावे** -

"यांत्रिक नौका समुद्रात गस्तीसाठी सक्षम असल्याचे, सक्षम अधिकाऱ्याचे विधीग्राह्य प्रमाणपत्र (Seaworthiness Certificate) असणे आवश्यक राहील (Merchant Shipping Act, १९५८ नुसार) (निविदेच्या दिनांकास विधीग्राह्य असलेले)

**अ.क्र. ९ ऐवजी खालीलप्रमाणे वाचावे** -

"गस्ती नौकेचा कार्यकाळ त्या चालू वर्षीच्या मासेमारी हंगाम तसेच पावसाळी मासेमारी बंदी कालावधी सुरु झाल्याच्या ७ दिवस नंतर व पावसाळी मासेमारी बंदी कालावधी शिथील होण्याच्या ७ दिवस आधी म्हणजेच दिनांक २५ जुलै ते ७ जून असा राहील"

**अ.क्र. १० ऐवजी खालीलप्रमाणे वाचावे** -

"गस्ती नौकेस महिन्यातून स्थानिक परिस्थितीनुसार सुट्टीचा दिवस अथवा रविवार या दोहोपैकी एक दिवस सुट्टी वगळून बाकी सर्व दिवस गस्त घालावी लागेल. सुट्टीच्या दिवशी भाडे देय असणार नाही. यांत्रिक नौकेस सागरी गस्तीचे काम महिन्यातून

किमान २५ दिवस (आवश्यकतेनुसार ३० दिवस) राहील. तसेच आवश्यकतेनुसार रात्रीसुद्धा व इतर सागरी जिल्ह्यात गस्त घालावी लागेल.

गस्ती नौकेस सागरी गस्तीचे काम एका दिवसांत किमान आठ तास व महिन्यातून किमान २५ दिवस (आवश्यकतेनुसार ३० दिवस) राहील. गस्ती नौकेने दररोज किमान ५० नॉटीकल माईल अंतर कापणे बंधनकारक असेल व त्याबाबतची नोंद ठेवणे आवश्यक राहील. त्यानुसारच गस्ती नौकेचे देय भाडे अनुज्ञेय असेल. यांत्रिक नौकेने नमूद केलेल्या किमान निकषांपेक्षा कमी तास व कमी नॉटिकल मैल अंतर कापल्यास त्या दिवसाचे/ कालावधीचे देय ठरलेल्या दराच्या केवळ ५० टक्के भाडे देय राहील. (अर्धा दिवस ग्राह्य धरण्यात येईल)"

२. सदर शासन शुद्धीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२१०९०७१३००२३३४०१ असा आहे. हे शुद्धीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Shrinivas Jagannath Shastri

Digitally signed by Shrinivas Jagannath Shastri
DN: c=IN, o=Personal, title=2388, pseudonym=ca8d31b3edf9920fda8c1d0f5f135a08db96d9d51605 2454832375d63a281822, postalCode=410210, st=Maharashtra, serialNumber=c02f19ac7e7ab3a50d817c95cf483e33229cf0cbb03 283b175900630f81d2337, cn=Shrinivas Jagannath Shastri
Date: 2021.09.07 13:04:27 +05'30'

**(श्रीनिवास शास्त्री)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. मा. मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव (सर्व)
४. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य
५. प्रधान सचिव (पदुम), मंत्रालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६. आयुक्त मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७. सह आयुक्त (सागरी), मत्स्यव्यवसाय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८. प्रादेशिक उपायुक्त, मत्स्यव्यवसाय, कोकण विभाग, मुंबई.
९. सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय, पालघर/ठाणे/मुंबई शहर/मुंबई उपनगर/ रायगड/ रत्नागिरी/सिंधुदुर्ग.
१०. महालेखापाल (लेखापरीक्षक/लेखा अनुज्ञेयता) मुंबई/नागपूर
११.निवडनस्ती.